**प्रेसनोट**

अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव
दि. २६/०३/२०२१

**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गुन्हयातील तक्रारदार श्री. विशाल पंडीत सोनवणे, रा. भिमनगर, बोदवड फितुर झाल्याने त्यांचे विरुध्द सीआरपीसी ३४४ प्रमाणे खटला दाखल होवुन झालेल्या शिक्षे बाबत**

———————————————ooo———————————————

तक्रारदार श्री. विशाल पंडीत सोनवणे यांना आधारकार्ड काढणे असल्याने ते अधीकृत महा ई–सेवा केंद्र, जामनेर रोड बोदवड येथे गेले तेव्हा त्यांना तेथील श्री निलेश देशमुख व चंद्रकांत नामदेव महाजन, ऑपरेटर यांनी आधारकार्ड काढण्यासाठी १६० रुपये लाचेची मागणी केल्याने त्यांनी ला.प्र.वि. जळगांव येथे तक्रार दिली होती. सदर तक्रारी वरुन सापळा कारवाई करण्यात आली. व सदर दोन्ही आरोपीतांवर अति. जिल्हा व सत्र न्यायालय, भुसावळ येथे स्पेशल केस नं १२/२०१५ अन्वये खटला दाखल करण्यात आला होता.

सदरची केस मध्ये तक्रारदार श्री. विशाल पंडीत सोनवणे यांची मा. न्यायालयात साक्ष घेण्यात आली. सदर केस मध्ये त्यांनी खोटी साक्ष दिल्याने सदरची केस ही दि.१३/०१/२०२० रोजी मा. न्यायालयाने निर्दोष केली आहे.

त्यामुळे आम्ही सदर केस मधील फितुर तक्रारदार यांचेवर कार्यवाही होणेसाठी श्री विजय खडसे, सरकारी अभियोक्ता, भुसावळ यांना विनंती केली. त्यानुसार सदर गुन्हयातील तक्रारदार श्री. विशाल पंडीत सोनवणे रा. बोदवड यांचेविरुध्द मा. न्यायालयात खोटी साक्ष दिल्यावरुन सीआरपीसी ३४४ प्रमाणे मा. न्यायालयात दि.११/०२/२०२० रोजी खटला दाखल करण्यात आला. सदरची केस मा. अति. जिल्हा व सत्र न्यायाधिश श्री. एस.बी.भंसाली यांचे न्यायालयात चालुन दि. २५/०३/२०२१ रोजी फितुर तक्रारदार श्री. विशाल पंडीत सोनवणे यांना मा. न्यायालयाने दोषी ठरवुन त्यांना ०२ महीने सश्रम कारावास व ५०० रु. दंड अशी शिक्षा दिली आहे.

पोलीस उप अधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो, जळगांव

(जी.एम. ठाकुर)
पोलीस उप अधीक्षक
ला.प्र.विभाग, जळगांव